शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' २०२६–२०२७ करिता नामांकन अर्ज सादर करण्याबाबत.

सूचनापत्र

१. महाविद्यालयाच्या/ अधिविभागाच्या लॉगीन मधून भरलेले नामाकंन अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रांची प्रिंट घेण्यात यावी, त्यानंतर नामाकंन अर्जावर रु. १/– चा स्टॅम्प लावलेली ॲड.स्टॅम्प रिसीटवर संबंधित विद्यार्थ्याची सही घेवून सदरचा नामाकंन अर्ज मा. प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांच्याकडून **दि. २५/११/२०२६** पर्यंत पडताळणी करण्यात यावा. तसेच नियमावलीनुसार विद्यार्थी इतर शिष्यवृत्ती घेत नसलेबाबत खात्री करुन मा.प्राचार्य व मा.अधिविभागप्रमुखांच्या सही व शिक्क्यासह विद्यापीठाकडे नामांकन अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह त्यांची वर्गवारी करुन या कार्यालयास **दि.२७/११/२०२६** पर्यंत पाठवावेत.

२. विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान, तसेच आंतर–विद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखांनिहाय ६० टक्केपेक्षा अधिक गुण मिळवून गुणानुक्रमे प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होवून भाग १ वरुन भाग २ ला प्रवेशित, भाग २ अभ्यासक्रमात उत्तीर्ण होवून भाग ३ ला प्रवेशित, व पदव्युत्तर पातळीवरील भाग १ या अभ्यासक्रमास आपल्या महाविद्यालय/ अधिविभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी/विद्यार्थींनी प्रत्येक वर्गात संभाव्य पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींची गुणवत्ता यादी परीक्षा विभागाकडून या विभागास प्राप्त झालेली आहे. सदरची **संभाव्य पात्र** विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या वेबसाईटवरील Shivaji University Merit Scholarship 2025-2026 या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. संबंधित संभाव्य पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनीचें ऑनलाईन अर्ज महाविद्यालयानी/अधिविभागानी तात्काळ आवश्यक अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रांच्या हार्ड कॉपी विद्यापीठ कार्यालयाकडे पाठविणे बंधनकारक आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

३. संलग्नीत महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभागानी उपरोक्त संकेत स्थळावर ठेवण्यात आलेल्या गुणवत्ता यादी मध्ये एखादया अभ्यासक्रमाचा समावेश नसल्यास सदर अभ्यासक्रमाची माहिती संबधीत विद्यापीठातील परीक्षा विभाग/पदव्युत्तर प्रवेश विभाग यांना लेखी स्वरूपात देण्यात यावी.

४. संबधीत महाविद्यालये/अधिविभागानी सर्वसाधारण घटकातील संकेतस्थळावर ठेवण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांच्या नामांकन अर्जाबरोबर अर्थिक दुर्बल घटक, निराधार घटक, दिव्यांग घटक, गुणवंत खेळाडू, शहीद सन्मान तसेच तृतियपंथी विद्यार्थी शिष्यवृत्तीचेही ऑनलाईन नामांकन अर्ज भरून घेवून उपरोक्त दिनांकास सादर करावेत.

५. संबधीत महाविद्यालये/अधिविभागानी इतर घटकातील शिष्यवृत्तीकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून मार्च २०२७ पर्यंत वैध असणारे महसूल दाखले नामाकंन अर्जासोबत जोडले असलेची खात्री करावी व योग्य शिफारसीसह या कार्यालयाकडे पाठवावेत.

–२–

६. कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातून मार्च/एप्रिल २०२६ मध्ये १२ वी च्या परीक्षेत प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होवून ६० टक्केपेक्षा अधिक गुण मिळवून गुणानुक्रमे उत्तीर्ण झालेल्या व आपल्या महाविद्यालय /अधिविभागात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमामध्ये भाग १ या वर्गात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांपैकी प्रत्येक विद्याशाखेतील सर्वाधिक गुण मिळविलेल्या गुणानुक्रमे पहिल्या **फक्त पाच (०५) विद्यार्थ्यांचे** वरील प्रमाणे ऑनलाईन अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यालयास उपरोक्त दिलेल्या तारखेपूर्वी पाठवावेत

७. महाविद्यालये /अधिविभागानी संबंधित संभाव्य पात्र ठरलेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या अर्जाची व अपलोड केलेल्या कागदपत्रांची हार्ड कॉपीसह विद्यार्थ्यांच्या अर्जाची अभ्यासक्रमनिहाय वर्गवारी करुन स्वखर्चाने या कार्यालयास **दि. २७/११/२०२६** पर्यंत प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांच्या शिफारशीसह सादर करुन विद्यापीठास सहकार्य करावे. **तद्नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.**

८. सदर माहिती संलग्नीत महाविद्यालयातील/अधिविभागातील प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांच्या तसेच संबंधित टेबलचे काम पहाणारे लेखनिक यांच्या निदर्शनास आणण्यात यावी. तसेच सदरची माहिती विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा ठिकाणी नोटीसबोर्डवर लावण्यात यावी. सदर शिष्यवृत्ती योजनेच्या नियमांमध्ये बदल/सुधारणा करावयाचे अधिकार तसेच एखाद्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांबाबत वर्गातील अनुपस्थिती, वर्तणूक इत्यादी संदर्भात प्रतिकूल अहवाल आढळल्यास संबंधित विद्यार्थ्याकडून शिष्यवृत्ती काढून घेण्याचे सर्व अधिकार विद्यापीठास राहतील.

९. शैक्षणिक वर्ष २०२६—२०२७ करीता गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणा—या या पात्र विद्यार्थ्यांनी **(राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, एसटीसी, पीटीसी सवलत वगळून)** विद्यापीठाची/राज्य शासनाची/केंद्र शासनाची यापैकी कोणतीही शिष्यवृत्ती घेत नसल्याबाबतचे हमीपत्र संबंधित महाविद्यालय /अधिविभागाचे मा. प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत पाठविणे आवश्यक आहे. तसेच संबधीत विद्यार्थ्यांने **नियमित विद्यार्थी प्रवेशाबाबत पैसे भरलेली पावती, बॅक खाते कमांक, IFSC Code & MICR Code माहिती, बॅक पासबुक छायांकित प्रत व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड छायांकित प्रत अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.**

१०. महाविद्यालये/अधिविभागानी सदर शिष्यवृत्तीचे कोणत्याही सबबीवर मॅन्यूअल अर्ज पाठवू नयेत, तसेच अशा मॅन्यूअल अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्र व्यवहारही केला जाणार नाही. अशा प्रकारचे विद्यापीठास प्राप्त झालेले अर्ज दप्तरी दाखल केले जातील याची कृपया नोंद घ्यावी.

११. महाविद्यालये/पदव्युत्तर अधिविभागानीं उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अधिक माहितीकरिता पदव्युत्तर प्रवेश विभाग, मुख्य इमारत,खोली कं २०२ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दूरध्वनी कं. (0231) 2609142, 9449 येथे संपर्क करावा.

———————————०००———————————